**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.६ (पंच) यांचा पुरावा</u> :-**

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : छबु गवजी भोसले,

वय : ६३ वर्षे, धंदा : मजुरी,

राहणार : वॉर्ड क्र.२, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सी. बी. अग्रवाल यांच्यातर्फे-</u>**

**१.** दिनांक ०३/०३/२०२२ रोजी पोलिसांनी मला शहर पोलिस स्टेशन, श्रीरामपुर येथे बोलाविले होते. त्यामुळे मी तेथे गेलो होतो. पोलिसांनी माझ्यामसक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलिसांनी मला सही मागितली त्यावरुन मी सही केली. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीला **निशाणी क्रमांक ५३** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे भारतीय पुरावा कायदा, १८७२ कलम १५४ प्रमाणे पुरावा घेण्याची परवानगी अभियोग पक्षास विनंती वरुन देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०३/२०२२ रोजी पोलिसांनी मला शहर पोलिस स्टेशन, श्रीरामपुर येथे बोलाविले होते, त्यावेळेस पोलिस स्टेशन येथे एक इसम हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष सदर इसमास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप भाउराव बनसोडे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपीने पोलिसांना गुन्हयातील वापरलेले दांडके काढून हजर करतो असे सांगितले व त्यानुसार माझ्यासमक्ष आरोपीने सदर दांडके काढून पोलिसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून दांडके जप्त केले व त्यासंबंधीचा जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा खरा असल्यामुळे मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या ओळखीचे असल्यामुळे मी त्यांना वाचविण्याकरिता आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्रमांक १ ते ४ करिता वकील श्री. के.बी. शेख यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : १२/०२/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.